# डॉ.होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी, मुंबई

## १५-मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२.

**शोध समिती**

**कुलगुरू या पदासाठी अर्ज मागवित आहे.**

महाराष्ट्र शासनाने डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी या समूह विद्यापीठाची स्थापनाकेली असूनया विद्यापीठामध्ये विज्ञानसंस्था,मुंबई,एलफिस्टनमहाविद्यालय, मुंबई, सिडेनहॅम महाविद्यालय, मुंबई व शासकीय अध्यापक महाविद्यालय,मुंबई यांचा समावेश आहे.विज्ञान संस्था मुंबई ही समूह विद्यापीठाची अग्रणी संस्था आहे.महाराष्ट्र शासनाने या विद्यापीठाकरिता अधिसूचना काढलेली असून त्याची स्वतंत्र नियमावली आहे. या विद्यापीठाची स्थापना,राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षण अभियान(रुसा) यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार करण्यात आलेली असून हे विद्यापीठ महाराष्ट्र राज्याचे प्रथम समुह विद्यापीठ आहे.विद्यापीठाची अपेक्षा आहे की राज्यात उच्च शिक्षण प्रणाली नवीन जोमाने आकारली जावी.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा,२०१६मध्ये कुलगुरूंच्या निवडप्रक्रियेबाबत वस्तुनिष्ठ व पारदर्शक पद्धतीची तरतूद करण्यात आलेली आहे ज्यामधे, विद्यापीठाचे रूपांतर एका शैक्षणिक व व्यावसायिक दृष्ट्या श्रेष्ठ अश्या केंद्रात करू शकेल असे उत्तम नेतृत्वगुण आणि प्रशासन कौशल्य असलेल्या ज्येष्ठ विद्याव्यासंगी व्यक्तीची कुलगुरू पदाकरिता निवड करण्यासाठी अधिनियमांची रचना करण्यात आली आहे.

कुलपती तथा महाराष्ट्र राज्याचे माननीय राज्यपाल यांनी या विद्यापीठाच्या कुलगुरु पदाकरिता यथोचित व्यक्तीची शिफारस करण्याकरिता त्रिसदस्यिय शोध समिती तयार केली आहे.ही शोध समिती दि. २७ मे २००९ रोजीच्या महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रानुसार कुलगुरूंच्या पदाकरिता विहित केलेली अहर्ता व अनुभव वा अटींची पूर्तता करणाऱ्या तसेच हे आव्हानात्मक काम करण्यास ईच्छुक असलेल्या ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञांकडून नामनिर्देशने/निवेदने मागवित आहे. या पदाकरिता आवश्यक अहर्ता व अनुभव,ईष्टतम अनुभव आणिकौशल्ये व नैपुण्य या बाबतची आवश्यक ती तपशीलवार माहितीतसेच अर्जाचा नमूना विद्यापीठाच्या https://iscm.ac.in/homi.php यासंकेत स्थळावर दिलेला आहे.

ईच्छुक व्यक्तींनी आपला तपशीलवार गोषवारा विद्यापीठाच्या संकेत स्थळावर उपलब्ध असलेल्या नमुन्यात त्याच्या/तिच्या उमेदवारीबाबतचे दोन पानी समर्थन,विद्यापीठा करीता दोन पानी भविष्यलक्षी योजना (vision)व त्याच्या/तिच्या कार्याची नीट ओळख असलेल्या तीन नामांकित व्यक्तींची नावे/संपर्क माहितीसह सादर करावा. संस्थांना सुद्धा त्यांना योग्य वाटेल अश्या उमेदवारांची नामनिर्देशने पाठवितायेतील.

शोध समितीने श्री अनोजकुमार चडार, प्रधान वैज्ञानिक, सीएसआयआर यांची संपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.संबंधित उमेदवाराने त्यांचा अर्ज/नामांकन विहित नमुन्यात चार प्रतींमध्ये व त्याच सोबत संगणकीकृत प्रत (softcopy)संपर्क अधिकारी यांचेकडे दि. २९/१०/२०२० पर्यंत किंवा त्यापूर्वी पोहोचतील अश्या रीतीने खालील पत्त्यावर पाठवावीत. त्यानंतर प्राप्त झालेले अर्ज/नामांकने विचारात घेतले जाणार नाहीत.

**पत्ता**-प्रधान वैज्ञानिक,महानिर्देशक कार्यान्व्ययन संचालनालय, वैज्ञानिक तथा औद्योगिक अनुसंधान परिषद, कक्ष क्रमांक-१२१, अनुसंधान भवन-२, रफी मार्ग,नवी दिल्ली-११०००१.

**ई-मेल**-dgedcsir@csir.res.in

**दूरध्वनी क्रमांक**- 011-23730342

**भ्रमणध्वनी क्रमांक**-7011792316

आवश्यकता भासल्यास शोध समिती निवड सूचीतील उमेदवारांना विचारांच्या आदान-प्रदानासाठी आमंत्रित करेल.या माध्यमातून नवनवीन उपक्रम व संशोधन प्रकल्प राबवून संस्थेला उत्तुंगशिखरावर नेण्याची तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान देण्याची ही शैक्षणिक प्रशासकांना सुवर्ण संधी आहे.

दिनांक २९/०९/२०२० अध्यक्ष

शोध समिती

---